क्रमांक :- ६९

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग – दोन

## गुरुवार, दिनांक २३ एप्रिल, २०२६ / वैशाख ३, शके १९४८

**६९. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-**

विधानसभेचे सन २०२५ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक ३ मार्च, २०२५ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन बुधवार, दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात एकूण २९३ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. २९३ निवेदनांपैकी २५ निवेदने मा. सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आलेली होती व एकूण २६८ निवेदनांपैकी ९४ निवेदने गुरुवार, दिनांक १२ जून, २०२५ रोजीच्या पत्रक भाग – २ क्रमांक ६४ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली. तसेच १७४ निवेदनांपैकी ४५ निवेदने गुरुवार, दिनांक ११ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्रक भाग – २ क्रमांक ११५ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. १२९ निवेदनांपैकी १६ निवेदने सोमवार, दिनांक २० ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रक भाग – २ क्रमांक १२१ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. ११३ निवेदनांपैकी ७३ निवेदने गुरुवार, दिनांक २२ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रक भाग – २ क्रमांक ४ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. आता ४० निवेदनांपैकी ८ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीद्वारे सन्मा. विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (Online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (Online) पध्दतीने निवेदने प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग -२ द्वारे अवगत करण्यात येईल.

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : २३ एप्रिल, २०२६

मेघना तळेकर
सचिव – २,
महाराष्ट्र विधानसभा

याची प्रत :

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
१०) संगणक कक्ष (Website)
११) एम.के.सी.एल.

लक्षवेधी सूचना क्रमांक २३

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे १ले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. विजय वडेट्टीवार, विधानसभा सदस्य यांनी दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २३ पुढीलप्रमाणे आहे:-**

"मागील तीन वर्षापासून महामिनरल या कंपनीला महाराष्ट्र स्टेट मायनिंग कॉर्पोरेशन कंपनीव्दारे दिल्या गेलेल्या करारनाम्यानुसार कोल वाश करून कोळसा पुरवठा करण्याचे करारनामे केलेले असणे. यामध्ये अनेक कोल वाश करणाऱ्या कंपन्यांना पुरवठा आदेश देणे, महामिनरल कंपनीला तीन वर्षात किमान ३०० लक्ष टन कोळसा देणे, मात्र महाजनको कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत संगनमत करून निकृष्ठ व राखळ मिश्रीत कोळसाचा पुरवठा करून महाजेनकोला पुरवठा करण्यात येणारा उच्चप्रतीचा कोळसा अधिका-यांच्या संगनमाने तसेच रिजेक्ट कोलच्या नावाखाली मिळणारा १५ टक्के कोळसा बाजारात परस्पर विक्री करणे, पुरवठा करावयाच्या एकूण प्रमाण (क्वांटीटी) पैकी ४० लक्ष मेट्रीक टन कोळसा यांनी खुल्या बाजारात विकून कोटयवधीचा भ्रष्टाचार करणे, याबाबत प्रधान सचिव, ऊर्जा विभाग यांच्याकडे तक्रार होताच चौकशीअंती त्यांच्याकडुन ५०० कोटीचा दंड ठोठावण्यात येणे, मात्र अधिकाऱ्यांनी फेरचौकशीच्या नावाखाली दंडाची रक्कम चक्क ५० टक्यावर आणून ती २४० कोटी करणे, यात महामिनरल कंपनीने महाजनको कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत संगनमत करून कागदामध्ये हेराफेरी करून शासनाची करोडो रूपयांनी फसवणूक केल्यानंतर सुध्दा पुन्हा याच कंपनीला ४ लक्ष मेट्रीक टन कोळसा पुरवठा करण्याचे आदेश देणे, या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी न करता भ्रष्टाचार करणाऱ्या कंपनीसह अधिकाऱ्यांना पाठिशी घालत असल्याने नागरिकात पसरलेला तिव्र असंतोष, त्यामुळे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

### मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

मे. महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ (MSMC-Maharashtra State Mining Corporation Ltd.) हा महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम असल्यामुळे आवश्यक त्या मात्रा व गुणवत्तेचा धुतलेला कोळसा पुरविण्यासाठी महानिर्मितीने डब्ल्यू.सी.एल. (WCL- Western Coalfields Limited), एस.ई.सी.एल. (SECL-South Eastem Coatfields Limited) आणि एम.सी.एल. (MCL- Mahanadi Coalfields Limited) यांच्या खाणीतील कच्चा कोळसा उचलून वॉशरीमधून धुतलेला कोळसा महानिर्मिती कंपनीच्या विविध औष्णिक वीज केंद्रांना पुरविण्यासाठी मे. MSMC ला "नोडल एजन्सी" म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. मे. MSMC ने हिंद महामिनरल एल.एल.पी. या वॉशरी

प्र/६२५

(८८)

लक्षवेधी सूचना क्र.२२८७

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**श्री. उमेश ऊर्फ चंदु यावलकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

" ठाणे महानगरपालिकेतील अनेक विकासकांनी सरकारी जमीन बळकावल्या असून सरकारी जमिनी कवडी मोलाच्या भावाने शासकीय अधिकाऱ्यांनी विकासकांना गैरव्यवहारातून बहाल केलेले आहे अनेक सरकारी पट्याच्या जागेवरती काही विकासकांनी अनाधिकृत बांधकाम करुन टाकलेले आहे प्रकरणी सातबाऱ्याच्या जागेवर परवानगी घेवून लगतच्या सरकारी जमिनीवरती अनाधिकृत ३०-३० माळयांचे टोलेजंग इमारती बांधून सदनिका धारकांची फसवणूक केलेली आहे, अशा अनेक तक्रारी ठाणे महानगरपालिकेत गेल्या १० वर्षात रोहीदास पाटीलसह नागरीकांनी केलेले आहेत, हा सर्व प्रकार महसूल अधिकारी व महापालिकेचे अधिकारी यांच्या गैरव्यवहारातून झालेले असून असेच एक प्रकरण माजिवडा सर्व्हे क्रमांक ३८६/१ खाजण सरकारी जमिनी कापूरबावडी ते कळवा खाडीपर्यंत असलेल्या नाल्यालगत शेतजमिन महसूल नोंद १/ ई ला असलेले शेतकरी रोहिदास इंद्रपाल बाळा पाटील यांचे मा. उच्च न्यायालय जनहित याचिका क्र. २०४/२०१० चे आदेशात नियमानुकूल शेतकऱ्यांचे नाव असताना महसूल अधिकारी महापालिकेच्या नगररचना अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार करुन सरकारी जमिनीचे विकास हस्तांतरण करुन देण्याचे कायदे नसताना गैरकायदेशीर खाडीकडे जाणाऱ्या मलनिःसारण नाल्याचे सरसकट पाच एकरचे विकास हस्तांतरण संबंधित विकासकाला दिल्याने विकासकाने गैरकारभारातून करोडो रुपये शेतकऱ्यांचे व शासनाचे डुबवलेले असून संबंधित विकासक व हितसंबंध जपणारे अधिकाऱ्यांची लाचंलुचपत प्रतिबंधक खात्याकडून चौकशी करुन शासनाने करावयाची कार्यवाही व उपायायोजना."

---

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

मौजे माजिवडा, ता.जि. ठाणे येथील स.नं. ३८६ येथील जमिनीचे पिकपाहणी उतारे पाहता, सदरची जमीन ही सन १९४८ पासून "खाजण" असल्याचे आढळून आलेले आहे. मौजे माजिवडे च्या गाव नमुना नं. १ई अतिक्रमण नोंदवहीमध्ये सर्व्हे नंबर ३८६ मधील २३ गुंठे क्षेत्रावर श्री. इंद्रपाल बाळा पाटील यांचे भातशेती व झोपडीचे अतिक्रमण १९८४ च्या पूर्वीपासून असल्याची नोंद दिसून येते. तथापि, श्री. इंद्रपाल बाळा पाटील यांचे सदरचे अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबतचे कोणतेही आदेश शासन स्तरावरून झाल्याचे दिसून आलेले नाही, असे जिल्हाधिकारी ठाणे यांनी अहवालामध्ये नमुद केले आहे. तसेच अतिक्रमण नियमनाकूल करण्याबाबत श्री.आर.व्ही.भुस्कुटे व रोहिदास इंद्रपाल बाळा पाटील यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्रं. २०४/२०१० मध्ये मा. न्यायालयाने याचिकाकर्त्यांना अतिक्रमण नियमितीकरणाबाबतचे अर्ज सक्षम प्राधिकरणाकडे करण्याबाबत निर्देशित करून सदरची जनहित याचिका निकाली काढलेली आहे.

मौजे माजिवडा, ता.जि. ठाणे येथील फेरफार क्र. १९२० पाहता, सर्व्हे नंबर ३८६ मधील ३८६/६अ, क्षेत्र ०.६०.०० हे.आर क्षेत्र मुंबई महानगरपालिका यांना पाईपलाईनसाठी कब्जेहक्काची रक्कम स्विकारुन देण्यात आलेली आहे. मौजे माजिवडा, ता.जि. ठाणे येथील फेरफार क्र. १९५०, दि. २८/०४/१९८६ पाहता सर्व्हे नंबर ३८६ येथील एकूण क्षेत्रापैकी १७.००.०० हे.आर इतकी जमीन पोलीस आयुक्त, ठाणे यांना प्रदान करण्यात आली आहे.

लक्षवेधी सूचना क्र. १६२२

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे प्रथम अधिवेशन

श्री. रविशेठ पाटील वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १६२२ पुढीलप्रमाणे आहे:-

"रायगड जिल्हयातील खारेपाट विभागातील महसूली गावातील मे.मुंबई एस.ई.झेड लि. या कंपनीने संपादित व खरेदी खताने नावे केलेल्या शेतजमिनी प्रकल्प अनेक वर्षापासून सुरू न झाल्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना परत मिळाव्या अशी मागणी करण्यात येणे, कंपनीच्या नावे ७/१२ असलेल्या या शेतजमिनी शेतकऱ्यांच्या ताब्यात असून शेतकरी कुटूंबाचे उदर निर्वाह करण्याचे अन्य साधन नसल्याने शेती करून उपजिविका चालविण्यात येणे, जमीनींचे हस्तांतरण भुसंपादन अधिनियम १८९४ चे कलम ११ क व ४१ अन्वये रदद करून मे. मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र लि. कंपनीचे नावाची कब्जेदार सदरी झालेली नोंद रदद करून शेतकऱ्यांच्या नावे पुर्ववत करून देणेकरिता मागणी करण्यात येणे, सदर मागणीनुसार शासनाकडून अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

---

### श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

रायगड जिल्ह्यातील उरण, पेण, व पनवेल तालुक्यातील गावांमधील शेतजमिनी मे. मुंबई एस.ई.झेड. या प्रकल्पासाठी भूसंपादन संमती निवाडा, विकास आयुक्त उद्योग आणि जिल्हाधिकारी यांचेकडील आदेशानुसार त्या त्या अधिनियमाखाली खाजगी जमिनी संबंधित कंपनीस विशेष आर्थीक क्षेत्र या प्रयोजनासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सदर जमिनी परत करण्याच्या मागणी बाबत सन २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये दिलेल्या आश्वासनानुसार मा. मंत्री (महसूल) यांच्या स्तरावर दि. २३.०५.२०२३, दि. २५.०७.२०२३ व दि.१०.०७.२०२४ रोजी बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत.

याबाबत मा. मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली दि.१०.०७.२०२४ रोजी झालेल्या बैठकीमधील निर्देशानुसार नेमण्यात आलेल्या मा. अ.मु.स. (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली समितीने प्रचलित नियमातील तरतुदीनुसार संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी उचित कार्यवाही करावी अशी भूमिका घेतली आहे. तद्नंतरच्या कालावधीमध्ये प्रकरणी मा. मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली दि.०२.०४.२०२५ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचालनालयाने याबाबत विकासकाने सदर जागेवर अद्याप विकास झाला नसल्याचे अवगत केले. या पार्श्वभूमीवर विचाराधीन विशेष आर्थीक क्षेत्राच्या अधिसूचनेबाबतची सद्यस्थिती सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. याबाबत उद्योग संचालनालयाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या त्या अधिनियमातील तरतुदीनुसार उचित कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

---

प्र/६८२९

१३२

लक्षवेधी सूचना क्र.२३०६

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे प्रथम अधिवेशन

श्री. उमेश ऊर्फ चंदु यावलकर, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २३०६ पुढीलप्रमाणे आहे:-.

"बुलेट ट्रेन व नॅशनल हायवेच्या कथित एकूण २० प्रकरणांमध्ये गैरव्यवहाराबाबत २०२३ मध्ये चौकशी समिती नेमली असुन कोकण विभागीय आयुक्त सदर समितीचे अध्यक्ष होते त्याचप्रमाणे लोक आयुक्त व मानवी हक्क आयोग यांनीसुध्दा या प्रकरणी समित्या नेमल्या होत्या परंतु गैरकारभार करुन गैरव्यवहाराच्या माध्यमातुन संबंधित अधिकाऱ्यांनी दबाव टाकुन या समित्या गुंडाळल्या असल्यामुळे बुलेट ट्रेन व नॅशनल हायवेच्या कथित गैरव्यवहार हा गैरकारभारातुन संपुष्टात आल्याचे दिसुन आलेले आहे मौजे भरोडौ तालुका भिवंडी येशील सर्व्हे क्रमांक २१५/१ व ईतर एकुण आठ सर्व्हे नंबर बुलेट ट्रेन नॅशनल हायवेच्या भूसंपादनातील कथित मोटाळभाबाबत संबंधित बोगस शेतकऱ्यांनी बनावट साठेकरार बनवुन परस्पर १८ कोटी रुपये हडपल्याची तक्रार लोकआयुक्त मानवी हक्क आयोग व इतर प्राधिकरणाकडे यांनी केलेली आहे परंतु बनावट साठे करार वरुन बनावट लोकांना गेलेला मोबदला महणजे कल ४६४,४६५.४६७,४६८,४७१ व ४२० प्रमाणे गुन्हा दाखल करणे आवश्यक होते परंतु बनावट शेतकऱ्यांनी प्रशासना वरती राजकीय दबाव आणल्याने शेतकऱ्यांचा मोबदल्या बाबत भुसंपादन विभाग व समिती उदासीन आहे सदर प्रकरणामध्ये भ्रष्ट तात्कालीन उपविभागीय अधिकारी नळदकर व वाघचौरे यांना तात्कालीन मंत्र्यांनी बडतर्फ करुनही पुन्हा मलाईदार सेवेत रुजु केल्याने महसुल खात्याचा भष्टाचार चवाट्यावर आलेला आहे भुसंपादित झालेले शेतकऱ्यांना अजुनही मोबदला मिळाला नसल्यामुळे संबंधित बनावट शेतकरी यांच्यावरती गुन्हा दाखल करुन त्यांच्या कडुन भूसंपादनाच्या पैशाची पुर्नप्राप्ती करणे आवश्यक असल्याने शासनाने पिडित भूसंपादित शेतकऱ्यांच्या बाजुने सहानुभूतीपुर्वक विचार करून बनावट शेतकरी व भ्रष्ट अधिकारी यांच्या विरुध्द कठोर भुमिका घेऊन शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ".

---

## श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

शासन परिपत्रक क्र. विपता-२०२२/प्र.क्र.१५५/अ-२, दि.२३.०२.२०२३ अन्वये "बुलेट ट्रेनसाठी पालघर व ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत" विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय चौकशी समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीत विभागीय आयुक्त, कोकण, उपायुक्त (भूसंपादन), विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण, समन्वय अधिकारी, भूसंपादन शाखा, ठाणे हे सदस्य आहेत.

सदर समितीस पालघर व ठाणे जिल्ह्यातील बुलेट ट्रेन, मुंबई-अहमदाबाद द्रुतगती मार्ग, दिल्ली फ्रिड कॉरिडॉर (DFCCL) प्रकल्पाच्या भूसंपादनात अनियमितता अथवा गैरव्यव्हार झाल्याबाबत प्राप्त विविध तक्रारी व दाखल गुन्ह्यात सक्षम प्राधिकारी व अन्य महसूल अधिकारी यांचा सहभाग पडताळण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

सदर समितीने प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन त्याबाबत शासनास अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार सदर समितीचा तक्रार निहाय चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला असून सदर अहवालाच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही विचाराधिन आहे.

********************************

लक्षवेधी सूचना क्र.२५३४

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. विलास तरे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

“पालघर जिल्ह्यातील गी. आर. इन्फ्रा आणि मोंटोकारलो प्रायव्हेट लिमिटेड या दोन कंपन्यांकडून जव्हार, मोखाडा, तलासरी, वसई, विक्रमगड, पालघर, डहाणू व वाडा असे जिल्ह्यातील आठही तालुक्यांत विविध भागांतून गौन खनिज साठा (मुरुम) मोठ्या प्रमाणात उत्खनन् करुन उचलला जात असणे, सदर कंपन्यांना या कामासाठी महसूल विभागाकडून रॉयल्टी दिली असून रॉयल्टीच्या ४ पट अधिक उत्खनन् केल्याचे दिसून येणे, तसेच या माल वाहतूकीसाठी हायवा गाड्यांद्वारे ओव्हर् लोड करुन वाहतूक केली जात असल्याने सदर तालुक्यांतील गाव पाड्यांतील रस्त्यांची दुरावस्था झालेली असणे, या कंपन्यांनी रॉयल्टी पेक्षा जास्तीचे उत्खनन् महसूल व वन विभागाची परवानगी न घेता करत असल्याने शासनाचा शेकडो कोटींचा महसूल देखील बुडविला जात असणे, या प्रकरणी शासनाने संबंधित दोषी कंपनी व महसूल व वन विभागाचे अधिकारी यांच्यावर कडक कारवाई करण्याची आवश्कता, याबाबत यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

पालघर जिल्ह्याअंतर्गत जी.आर.इंफ्रा प्रो.लि. व मोंटेकार्लो लि. या कंपनींना मुंबई बडोदरा राष्ट्रीय महामार्गाच्या भरावासाठी जिल्हाधिकारी पालघर कार्यालयाकडून पालघर, वसई, वाडा, विक्रमगड, डहाणू या तालुक्यातून उत्खनन करण्याची परवानगी देण्यात आली आहे. जी.आर.इंफ्रा प्रो.लि. व मोंटेकार्लो लि. या कंपनींना मुंबई-वडोदरा राष्ट्रीय महामार्गाच्या प्रयोजनासाठी सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीत अनुक्रमे एकुण १७,०४,६०० ब्रास व १२,५२,००० ब्रास गौणखनिज उत्खननास परवानगी देण्यात आली आहे. त्याप्रमाणात संबंधित कंपनीकडून स्वामित्वधनाची रक्कम शासनजमा करण्यात आली आहे.

जी.आर.इंफ्रा प्रो.लि. व मोंटेकार्लो लि. या कंपनींना परवानगी दिलेल्या ज्या गटांमधून उत्खनन केले आहे, त्या गटांची ईटीएस मोजणी करून अतिरिक्त उत्खनन केल्याच्या अनुषंगाने शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, दिनांक १४.०६.२०१७ नुसार कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

जिल्हाधिकारी पालघर कार्यालयाच्या दि. १७.११.२०२५ च्या सुधारित अहवालानुसार, उपसंचालक भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय कोल्हापूर यांनी केलेल्या ईटीएस मोजणीअंती जी.आर.इंन्फ्रा प्रो. लि.कंपनीकडून २४,३६२ ब्रास अतिरिक्त उत्खनन करण्यात आले असल्याने, त्यासाठी रु. १.६४ कोटी स्वामीत्वधन वसुल करण्यात आलेले आहे. तसेच मोंटेकार्लो लि. कंपनीकडून २,०८,६९५ ब्रास अतिरिक्त उत्खनन करण्यात आलेले आहे, त्यासाठी रु.१३.८७ कोटी स्वामीत्वधन वसुल करण्यात आलेले आहे.

संबंधित कंपनीस उक्त नमूद केल्यानुसार गौण खनिज उत्खननासाठी मंजूर केलेले ब्रास व केलेले अतिरिक्त उत्खनन यांचे परिमाण विचारात घेता, संबंधित कंत्राटधारक कंपनीने

मंजूर परिमाणापेक्षा ०४ पट अधिक उत्खनन केल्याची बाब आढळून आलेली नाही. मंजूर परिमाणापेक्षा/रॉयल्टीपेक्षा जास्तीचे उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यानंतर शासन परिपत्रक दिनांक १४.०६.२०१७ नुसार वाढीव उत्खननासाठी संबंधिताकडून उक्तनुसार फरकाची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यामुळे रॉयल्टी बुडविण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच, अनधिकृत व भरलेल्या स्वामीत्वधन परिमाणापेक्षा जास्त प्रमाणात गौणखनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांवर वेळोवळी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

पालघर जिल्ह्याअंतर्गत अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रण व आळा घालण्याचे दृष्टीने, जिल्हा तसेच तालुका स्तरावर फिरते भरारी पथक नियुक्त करण्यात आले आहे.

.....................

लक्षवेधी सूचना क्र.२५४१

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. उमेश ऊर्फ चंदु यावलकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"ठाणे जिल्हयातील शेतकऱ्यांच्या जमिनी वन अधिनियम लागु करतांना कुठलेही कायदयाची पुर्तता न करता सुडबुध्दीने अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी वनविभागाने जबरदस्तीने शेतकऱ्यांच्या मिळकतीवरती वने दाखल केलेली आहेत साडेबारा हेक्टरपेक्षा जमिन नसलेल्या शेतकऱ्यांवरती सुध्दा वने लावल्याने पिडित शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण पसरलेले आहे मौजे-कावेसर येथील सर्व्हे क्र १५६ हि जमिन सन १९६५ साली आकारीपड असतानांच फेरफार क्रं. २७७ ने काशिनाथ तरे यांना शासनाने दिली होती त्यानंतर १२६१ ने वारस लागले परंतु जिल्हाधिकारी ठाणे यांनी सरकारी जमिन समजुन महाराष्ट्र दुग्ध उत्पादन सहकारी मंडळ यांना फेरफार क्र. १४४३ ने अदलाबदल दिली होती वनविभागाची जमिन कोलशेत सर्व्हे क्रं. २९१ मध्ये दुग्ध व्यवसायासाठी दिली तर कावेसर सर्व्हे क्र. १५६ ही सातबाऱ्यावरती शेतकरी मालकी जमिनीची कुठलीही खातरजमा न करता सरकारी जमिन समजुन परस्पर वनविभागाला जमिन दिली असुन अक्षम्य चुक जिल्हाधिकारी यांच्याकडून झाल्यामुळे पिडित शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे काम जिल्हाधिकारी प्रशासनकडून झाल्यामुले सदर चुकदुरुस्ती तात्काळ करणेसाठी शासनाने कठोर पावले उगलुन शेतकरीला न्याय देणेकामी करावयाची कार्रवाई व शासनाची प्रतिक्रिया."

---

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

मौजे कावेसर ता.जि.ठाणे येथील स.नं. १५६ या मिळकतीचे सन १९३८-३९ पासूनचे जूने ७/१२ उतारे पाहता सदर जागा सरकारी पडीत असलेचे दिसून येत असल्याबाबत जिल्हाधिकारी ठाणे यांनी नमूद केले आहे.

मौजे कावेसर ता. जि.ठाणे येथील फेरफार क्र. २७७ च्या अभिलेखांनुसार सदर फेरफार नोंद स.नं.४०/२७, ६६/६ व २१९/३ या जमीनीशी संबंधित असून सदरच्या लक्षवेधीमध्ये नमुद केलेले सर्व्हे नं. १५६ च्या जमिनीशी संबंधित नसल्याबाबतचे जिल्हाधिकारी ठाणे यांनी नमूद केले आहे.

तसेच मौजे कावेसर, ता.जि. ठाणे येथील फेरफार क्र. १२६१, दि.०४/१०/१९७३ अन्वये वारस नोंदीन्वये काशिनाथ रघु तरे यांचे वारस गोवर काशिनाथ तरे यांचे नाव दाखल असून सदर फेरफार नोंद स.नं. ३/४, ३/६, ९/६, १४/१, ३०/२, ३०/३, ३१/५, ३८/१९/ब, ९२/१, १९४/६, १९९/५, २६३/६ व २९३ पै. या जमिनीशी संबंधीत असून सदरच्या लक्षवेधीमध्ये नमुद केलेले सर्व्हे नं. १५६ च्या जमिनीशी संबंधित नसल्याबाबतचे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी नमूद केले आहे.

मौजे कावेसर, ता.जि. ठाणे येथील फेरफार क्र. १४४३, दि. १९/१२/८५ तालुका हुकमाने स.नं. १५६ जमीन (महाराष्ट्र शासन) सरकारी पड अशी दाखल आहे. सदर जमीन जिल्हाधिकारी ठाणे यांच्या दिनांक १२ नोव्हेंबर १९६३ अन्वये महाराष्ट्र दुग्ध उत्पादन सहकारी मंडळ यांना प्रदान करण्यात आली होती परंतु सदर जागा उपयुक्त व सोयीची नसल्याने महाराष्ट्र दुग्ध उत्पादन सहकारी मंडळाने सदर जागेच्या बदल्यात मौजे कोलशेत येथील स.नं. २९१ मधील ६ एकर जागा मागणी केल्याने त्यांना स.नं. २९१ मधील जागेचा ताबा देण्यात आलेला आहे.

मौजे कावेसर येथील स.नं. २९१ पै. ची जमीन ही रिझर्व (राखीव) फॉरेस्ट अशी होती. मात्र फेरफार क्र.१५९९ दि.१९/१२/१९८५ नुसार निर्वनीकरण झाले आहे. तसेच सदर जमिनीचा ताबा वन क्षेत्रपाल येऊर यांचेकडून दि.२९/११/८५ रोजी घेतला असून सदर जमीन महाराष्ट्र शासनाचे नावे करण्यात आली आहे. सदर जमिनीचा ताबा यापूर्वीच झालेल्या शासनाकडील पत्र दि.७/२/१९७० नुसार महाराष्ट्र दुग्ध उत्पादक सहकारी मंडळ मर्यादीत (पातलीपाडा) कोलशेत यांना दिला आहे.

मौजे कोलशेत येथील राखीव वने ची जागेच्या बदल्यात मौजे कावेसर येथील सरकारी पड जागा देण्यात आली असल्याने कावेसर येथील सरकारी पड स.नं. १५६ या जागेचा ताबा दिनांक २२/०४/१९७१ रोजी देण्यात आला असून सदर जमीन वनखात्याच्या नावे करणेबाबत महाराष्ट्र शासन महसूल व वन खाते मेमोरेंडम दि. ११/०६/७९ अन्वये मौजे कावेसर येथील सरकारी स. नं. १५६ क्षेत्र ६ एकर २४ गुंठे ही जागा वनविकास महामंडळ महाराष्ट्र राज्य मर्यादित (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय) यांचे नावे दाखल करण्यात आली.

उक्त जमिनीशी संबंधीत आदेशान्वये जमिनीच्या मालकीसंबंधात बदल झाले असून चुकीने बदल झालेले नाहीत असे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी नमूद केले आहे.

*******

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे प्रथम अधिवेशन

सर्वश्री. संदिप क्षीरसागर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी क्र. १७७६ पुढील प्रमाणे आहे.

"बीड जिल्ह्यातील आदर्श शिक्षण संस्था, नवगण शिक्षण संस्था, विनायक युवक कल्याण संस्था व अन्य शिक्षण संस्थामध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहार या शिक्षण संस्थेत कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीत झालेली अनियमितता बिंदुनामावली नुसार शिक्षक व कर्मचाऱ्यांची करण्यात न येणे या शिक्षक संस्थाना विविध लेखाशिर्षनिहाय मोठ्याप्रमाणात अनुदान मिळालेले असुन या अनुदानाचा विनियोग नियमानुसार न करता मनमानी पद्धतीने व नियमबाह्य रितीने करण्यात येणे संस्थाचालकाने संबंधीत जिल्हा परिषदाच्या जागा नियमबाह्य पद्धतीने स्वताच्या ताब्यात करुन घेणे या संस्थेत काम करण्याऱ्या कर्मचाऱ्यांकडून एका राजकीय पक्षाच्या उमेदवारांचा उघडपणे निवडणुकीत प्रचार करुन घेणे या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वेळोवेळी तक्रारी करुन सूद्धा त्यात शासनाचे झालेले दुर्लक्ष समाजकल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी चुकिची माहिती देऊन स्थानिक लोक प्रतिनिधी यांचा केलेला हक्कभंग या सर्व प्रकरणाची उच्च स्तरीय चौकशी करुण संबंधीता विरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना"

## मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन

बीड जिल्ह्यातील आदर्श शिक्षण संस्था, नवगण शिक्षण संस्था, नवगण राजुरी आणि विनायक युवककल्याण संस्था बीड अंतर्गतच्या संस्थेमार्फत खाली नमुद केल्याप्रमाणे एकूण ६९ शाळा संचलित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्य. कनिष्ठ महाविद्यालय | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्राथमिक | माध्यमिक | |
| १ | आदर्श | ०२ | २३ | १७ | ०१ | ०१ | ४४ |
| २ | नवगण | ०२ | १२ | ०७ | ०१ | ० | २२ |
| ३ | विनायक युवक कल्याण | ०२ | ०३ | ० | ० | ० | ०३ |

शाळांना लेखाशिर्ष निहाय प्राप्त अनुदानाचा विनियोग नियमानुसार करण्यात आलेला आहे. तसेच उपरोक्त शाळामध्ये नियमानुसार, संचमान्यते नुसार मान्य असलेल्या रिक्त पदावर बिंदुनामावली च्या निकषानुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

संस्थेच्या शाळेमधील कर्मचाऱ्यांनी निवडणूकीमध्ये प्रचार करणे बाबतची बाब क्षेत्रीय कार्यालयाच्या निदर्शनास आलेले नाही. इतर मागास बहुजन कल्याण विभाग स्वतंत्र होण्यापुर्वी तत्कालीन सहाय्यक आयुक्त,

समाज कल्याण, बीड यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी यांना व वरिष्ठ कार्यालयास सादर केलेली माहिती चुकीची नसुन वस्तुस्थितीदर्शक आहे.

आदर्श शिक्षण संस्था संचलित कोणतीही प्राथमिक/ माध्यमिक शाळा जिल्हा परिषदेच्या जागेमध्ये चालविल्या जात नाहीत.

**********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. उमेश यावलकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२३१२ पुढीलप्रमाणे आहे :-

"सामान्य प्रशासन विभागाअंतर्गत राजपत्रित अधिकारी भिवंडी महानगरपालिका, भिवंडी पंचायत समिती, तहसिलदार कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, महिला बालविकास कल्याण शिधावाटप कोर्यालय, ग्रामिण शहर पोलिस स्टेशन आदि विभागांमध्ये अधिकारी कर्मचारी कर्तव्याची जाणीव ठेवत नसुन जनतेला विनाकारण वेटीस धरुन ठेवतात, दोन वर्षापासूनची प्रलंबित कामे हजारोच्या संख्येने तक्रार अर्जाच्या गढेच्या गठ्ठे धुळ खात असुन कुठल्याही अर्जावर अहवाल चौकशी आदेश टिप्पण्या सरकारी मोजण्या करत नसुन तक्रारींची दखल घेतली जात नसणे, भिवंडीतील सर्व विभागाचे प्रशासनामध्ये गैरकारभार मोठ्या प्रमाणात पसरलेला असुन वारंवार लाचलुचपत प्रतिबंधक खात्याचे सापळे रचून अधिकाऱ्यांना पकडले जात आहेत, बोगस कागदपत्रांवरुन बोगस लोकांना भूसंपादनाचा मोबदला उपविभागीय अधिकारी कार्यालयातुन दिला जात आहे, हनुमान टेकडीवरील बांग्लादेशी लोकांना बोगस राशन कार्ड वाटप झालेले आहे पोलिस विभागात अटेंम्प्ट ऑफ मर्डरची तक्रार करणाऱ्या ईसमा विरुध्दच क्रॉस तक्रार घेऊन आरोपीला मदत करणे, असे कुंभारवाडा पोलिस स्टेशनसह इतर पोलिस स्टेशनमध्ये घडत आहे तक्रारदाराला न्याय मिळणे ऐवजी तक्रारदारालाच आरोपी बनवले जात आहे, बनावट कागदपत्रांची तक्रार आल्यास पोलिसांमार्फत गैरव्यवहारातुन दिवाणी स्वरुप असल्याचे समज तक्रारदाराला दिले जात आहे, १५६ (३) २०२ व उच्च न्यायालयांची दिशाभूल करण्यात येत आहे, भिवंडी महापालिकेत युपी बिहार सारखे जंगल राज्य असुन लिपीक सर्व्हेअर यांना सहाय्यक आयुक्त पदावर घेतलेले आहे, वेळेवर सरकारी मोजण्या केल्या जात नसल्याने शासनाने संबंधितांच्या विरुध्द करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

---

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

संपूर्ण राज्यात ई-मोजणी version २.१ प्रणाली कार्यान्वित असून विभागात http://११५.१२४.१०५.३१:८०६९/web/login या संकेतस्थळावरुन नागरिकांना त्यांचे लॉगीन आयडी मधुन स्वतः मोजणी अर्ज भरणेची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. मोजणी करीता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १३६ अन्वये अधिकार अभिलेखामध्ये (७/१२ उतारा किंवा मिळकतपत्रिका) भोगवटादार सदरी नोंद असणारी हितसंबंधीत व्यक्ती मोजणी कामी अर्ज दाखल करणेस पात्र ठरते. उप अधीक्षक, भूमि अभिलेख, भिवंडी या कार्यालयात ई-मोजणी version २.१ आज्ञावली मधून संबंधित अधिकार अभिलेख (७/१२) किंवा मिळकतपत्रिका धारक यांनी नागरिकांचे लॉगीन आयडी मधून मोजणी अर्ज भरल्यापासून ते मोजणी प्रकरण निकाली होईपर्यंत मोजणी अर्जाबाबतची सद्यस्थिती बघता येते. ई मोजणी version २.१ आज्ञावलीत आज अखेर २१० प्रकरण मोजणी होण्यावर शिल्लक असून नागरीकांना मोजणीबाबतच्या सर्व सुविधा वेळेत देण्याची तजविज उप अधीक्षक, भूमि अभिलेख, भिवंडी या कार्यालयामार्फत ठेवण्यात आलेली आहे.

ई-मोजणी version २.१ प्रणालीत खातेदारांना ऑनलाईन मोजणी अर्ज भरताना संगणकाबाबत काही तांत्रिक अडचण आल्यास भूमि अभिलेख विभागातील सर्व अधिनस्त उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालयांमध्ये मुख्यालय सहाय्यक / शिरस्तेदार यांच्या नियंत्रणाखाली ई मोजणी व्हर्जन २ हेल्पडेस्क (मदत कक्ष) स्थापन करण्यात आले आहेत. तसेच त्याबाबत संबधीत कार्यालयात माहिती फलक लावण्यात आले आहेत. त्यानुसार सर्वसामान्य नागरिकांना ऑनलाईन मोजणी अर्ज भरतांना येणा-या अडचणीचे निराकरण तात्काळ करण्यात येते. मोजणीबाबत नागरीकांकडून पोर्टलवर व कार्यालयात प्राप्त होणा-या तक्रार अर्जावर उप अधीक्षक, भूमि अभिलेख भिवंडी कार्यालयामार्फत तात्काळ नियमानुसार कार्यवाही करण्यात येते. आज अखेर उप अधीक्षक, भूमि अभिलेख भिवंडी कार्यालयात मोजणीबाबत कोणतीही तक्रार प्रलंबित नाही.

पंचायत समिती, भिवंडी अंतर्गत अधिकारी व कर्मचारी हे आपापल्या कर्तव्याची पूर्ण जाणीव ठेवून शासन नियम व मार्गदर्शक सूचनांनुसार कामकाज पाडतात. नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या अर्ज, तक्रारी व प्रस्ताव यांची नियमानुसार नोंद घेऊन त्यावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते. प्रलंबित प्रकरणांच्या बाबतीतही वेळोवेळी आढावा घेऊन ती निकाली काढण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतात. कायदेशीर, तांत्रिक किंवा कागदपत्रांच्या पूर्ततेअभावी प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी योग्य त्या मुदतीत कार्यवाही करण्यात येत आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्रअंतर्गत प्राप्त तक्रारीनुसार भिवंडी येथील विविध विभागातील सरकारी कार्यालयात सन २०२४ मध्ये ०६ सापळा कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये एकुण -०९ आरोपीविरुध्द कारवाई करण्यात आली आहे. तसेच सन २०२५ मध्ये ०४ सापळा कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये एकुण ०५ आरोपींविरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालयांतर्गत असलेल्या भिवंडी शहर पोलीस ठाणे येथे दि.२०.१२.२०२५ रोजी तीन आरोपींविरूध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३(५) व १०६ अन्वये गु.र.क्र.११११/२०२५ असा गुन्हा दाखल असून गुन्ह्याचा तपास चालू आहे. सदर गु.र.क्र.११११/२०२५ या गुन्ह्यातील आरोपीने गुन्ह्यातील फिर्यादीविरूध्द दिलेल्या तक्रारीवरून भिवंडी शहर पोलीस ठाणे येथे दि.२०.१२.२०२५ रोजी दोन आरोपींविरूध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), ११५(२), ३५०(१) व ३(५) अन्वये गु.र.क्र.१११२/२०२५ असा गुन्हा दाखल असून गुन्ह्याचे दोषारोपत्र मा.न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत अधिकारी कर्मचारी यांच्याविरुद्ध आपले सरकार पोर्टल, पीजी पोर्टल तसेच विविध ऑनलाईन व ऑफलाईन स्तरावरून प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने विहित मुदतीत नियमोचित कार्यवाही करुन तक्रारी अर्ज निकाली काढण्यात येत आहे. नुकत्याच झालेल्या महानगरपालिका सार्वत्रिक निवडनुकीमध्ये मनपातील बहुसंख्य अधिकारी व कर्मचारी हे निवडणुक कामामध्ये व्यस्त असल्याने तुरळक प्रलंबित अर्ज निकाली काढण्याबाबत कार्यवाही करण्याचे संबंधितांना आदेशीत करण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील बहुतांशी वरिष्ठ संवर्गातील पदे रिक्त आहेत. नगर विकास विभागाचा शासन निर्णय दि.३०.११.२०२२ अन्वये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदनिर्मीती प्रस्तावास व दि.१४/१२/२०२२ रोजीचे शासन निर्णयान्वये सुधारित

पृ/६३९

महानगरपालिका सेवाप्रवेश नियमावलीस मान्यता प्राप्त झाली आहे. महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२२ नुसार पदोन्नतीची रिक्त व सरळसेवेची रिक्त पदे टप्प्याटप्प्याने भरण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे. त्यामुळे महानगरपालिकेतील दैनंदिन कामकाजात अडचण निर्माण होवू नये याकरीता आयुक्त, महानगर पालिका यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील तरतुदीनुसार प्राप्त अधिकारानुसार महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचा-यांना प्रशासकीय कामाच्या सोईच्या दृष्टीने प्रभारी विविध पदांचे कामकाज सोपविण्यात येत आहे. सदर प्रभारी पदाबाबत त्यांना कोणतेही वाढीव वेतन व भत्ते मनपाकडून अदा करण्यात येत नाही.

उपविभागीय अधिकारी, भिवंडी कार्यालयात सुरु असलेल्या भूसंपादन प्रकल्पामध्ये प्राप्त होणाऱ्या तक्रारी अर्जाची तात्काळ नोंद घेवुन सुनावणी घेण्यात येऊन होणा-या निर्णयाप्रमाणे बाधित खातेदारास जमिनीचा मोबदला अदा करण्यात येतो. सदरचा मोबदला अदा करण्यापुर्वी संबंधित खातेदाराकडून शासकीय येणे नसल्याचा दाखला, तसेच खातेदाराकडून बायोमॅक्ट्रीक, अंगठ्याचा ठसा, फोटो, आधारकार्ड, पॅनकार्ड यांची पडताळणी करुन व तदनंतर ओळखीसाठी संबंधीत गावचा कोतवाल / पोलीसपाटील तलाठी यांच्याकडून खात्री पटल्यानंतरच मोबदला आरटीजीएस (NEFT) द्वारे अदा करणेत येतो.

अन्न व नागरी पुरवठा विभागाचे शासन पत्र दि.२०.०५.२०२५ व त्यासोबत प्राप्त अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे दि.०९.०५.२०२५ च्या पत्राव्दारे राज्यात अवैधरित्या वास्तव्य असणाऱ्या बांग्लादेशी नागरिकांच्या शिधापत्रिका यादीतील हनुमान टेकडी, भिवंडी येथे बांग्लादेशी नागरिकांची नावे प्राप्त यादीत नमूद असल्याचे आढळून आले. त्यानुसार उपनियंत्रक शिधावाटप फ परिमंडळ कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या, शिधावाटप कार्यालय क्र. ३७ फ भिवंडी विभागाचे शिधावाटप निरीक्षक यांनी सदर पत्त्यावर भेट दिली असता त्या ठिकाणी सदर यादीतील व्यक्ती किंवा त्यांचे कुटुंबातील इतर व्यक्ती कोणीही वास्तव्य करत नसल्याचे दिसून आले. तसेच प्रस्तुत गुन्ह्यात नोंद करण्यात आलेल्या नागरिकांकडे शिधापत्रिका व अवैध कागदपत्रे आढळल्याबाबत भिवंडी शहर पोलिस स्टेशनच्या अभिलेखावरील माहिती निरंक असल्याचे भिवंडी शहर पोलिस स्टेशनकडून कळविण्यात आले आहे. बांग्लादेशी नागरिकांना शिधावाटप कार्यालय क्र. ३७ फ भिवंडी या कार्यालयातून शिधापत्रिका वितरीत झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

**********************************